# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १७/०९/२०१८

## ग्रामपंचायत कार्यालय मांजरी खुर्द येथील ग्रामविकास अधिकारी व लिपीकास साडेचार हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांनी त्यांच्या पत्नीचे नावे मांजरी खुर्द येथे शेजजमीन आहे. सदर जागेवर तक्रारदार यांनी पत्र्याच्या रूमचे बांधकाम केले आहे. सदर बांधकाम केलेल्या रूमची ग्रामपंचायत रेकॉर्डच्या ८ अ च्या रजिस्टरला नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये अर्ज केला होता. त्यावेळी तक्रारदार यांच्याकडे मांजरी खुर्द ग्रामपंचातीचे ग्रामविकास अधिकारी लोणकर यांनी तक्रारदार यांच्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतीच्या ८ अ रजिस्टरमध्ये घेण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे पाच हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक १७/०९/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक प्रदिप लोणकर, ग्रामविकास अधिकारी याने तक्रारदार यांनी केलेल्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डच्या ८ अ रजिस्टला घेण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे पाच हजार रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४,५००/- रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक १७/०९/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक प्रदिप महादेव लोणकर, वय - ५५, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मांजरी खुर्द ता. हवेली जिल्हा पुणे याने तक्रारदार यांचेकडून ४,५००/- रूपयांची लाचेची रक्कम ग्रामपंचायत लिपीक रामदास शिवराम उंद्रे, वय ४९, रा. मांजरी खुर्द ता. हवेली याचेकरवी ग्रामपंचायत मांजरी खुर्द येथे स्विकारल्यावर त्या दोघांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचेवर लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज - **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.